# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे - ४११००७

# Savitribai Phule Pune University

Ganeshkhind, Pune - 411007

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दूरध्वनी क्रमांक : ०२०– २५६२११५६/५७/७९
Telephone : 020-25621156/57/79
ईमेल/ Email : boards@pun.unipune.ac.in

शैक्षणिक विभाग (मान्यता कक्ष)
Academic Section (Approval Cell)
वेबसाइट/ Website: www.unipune.ac.in


## परिपत्रक क्र. २०७/२०२६

### संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थासाठी
### शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता मार्गदर्शक सूचना

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थांमध्ये सन २०२६-२७ हे शैक्षणिक वर्ष सुरु झाले आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) २०२० ची अंमलबजावणी सन २०२३-२४ पासून स्वायत्त महाविद्यालयांमध्ये आणि सन २०२४-२५ पासून इतर सर्व संलग्नित महाविद्यालयांमध्ये/परिसंस्थेमध्ये सुरु झाली आहे. या पार्श्वभूमीवर खालील सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

- सन २०२६-२७ मध्ये सर्व प्राचार्य/उपप्राचार्य/विभागप्रमुख/अभ्यासक्रम समन्वयक यांनी NEP प्रमाणे व्यवस्थित वेळापत्रक तयार करावे. त्याची प्राधिकृत स्वाक्षरीकृत प्रत तास/वेळ/शिक्षकांचे पूर्ण नावासह महाविद्यालयाच्या/परिसंस्थेच्या सूचना फलकावर स्पष्टपणे लावण्यात यावी, वर्ग/विषय समन्वयकाचे नाव, संपर्क नंबर, ई-मेल हे सुध्दा त्यावर स्पष्टपणे लिहिण्यात यावे.
- प्रत्येक शिक्षकाची कोर्स फाईल तसेच कोर्स मटेरिअल व इतर बाबींसह फाईल विभागप्रमुख तसेच प्राचार्यांनी/उपप्राचार्यांनी तपासणे आवश्यक आहे, त्याचे साक्षांकन केलेले रेकॉर्ड ठेवणे आवश्यक आहे.
- अभ्यासक्रमांतील सर्व विषयांना शिकविणारे शिक्षक हे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ/उच्च व तंत्रशिक्षण विभाग (महाराष्ट्र शासन) तसेच सर्व शिखर संस्थांनी वेळोवेळी विहित केलेल्या शैक्षणिक पात्रता आणि अर्हता धारण करीत आहेत याची खातरजमा करावी. सर्व शिक्षक हे अर्हताधारक आहेत याची संपूर्ण जबाबदारी संबंधित संस्था/महाविद्यालयाच्या प्राचार्यांची आणि संस्थेची राहील याची नोंद घ्यावी.
- महाविद्यालयातील पायाभूत सुविधा जसे की ग्रंथालय (Library), प्रयोगशाळा (Laboratories) आणि वर्गखोल्या (Classrooms) या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या (NEP) निकषांनुसार

सुसज्ज आणि अद्ययावत असणे अनिवार्य आहे. ग्रंथालयात आवश्यक संदर्भ पुस्तके व ई-रिसोर्सेस उपलब्ध असावेत, तसेच प्रयोगशाळांमध्ये प्रात्यक्षिकांसाठी लागणारे सर्व साहित्य वापरासाठी योग्य स्थितीत असावे.

- प्रयोगाची अभ्यासपत्रिका व बॅचेसनिहाय वेळापत्रक, हजेरी तसेच इतर सर्व आवश्यक प्रात्यक्षिके आणि तासांचे रेकॉर्डस् विभागप्रमुख/उपप्राचार्य/प्राचार्य यांनी व्यवस्थित ठेवणे आवश्यक आहे.
- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रामधील सर्व महाविद्यालयांमध्ये महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ आणि विद्यापीठ अनुदान आयोग तसेच एआयसीटीई/एनसीटीई तसेच उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन आणि इतर शिखर संस्था यांचे वेळोवेळी निर्गमित झालेल्या आदेशानुसार आवश्यक असलेल्या सर्व समितीची रचना/बैठका/रजिस्टर याच्या नोंदी व्यवस्थित ठेवण्यात याव्यात.

सदर परिपत्रक विद्यापीठाच्या www.unipune.ac.in या संकेतस्थळावर Circular – Boards & Meetings Circular – Faculty- Common All Faculties या शीर्षकाखाली उपलब्ध आहे.

मा. प्राचार्य/संचालक विद्यापीठीय सर्व विभाग सर्व संलग्नित महाविद्यालये /मान्यताप्रप्त संस्था/यांना विनंती की, सदर परिपत्रकाचा आशय सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावा.

17/9/2026

गणेशखिंड, पुणे – ४११००७
जा. क्र. :– सीबी/२३५
दिनांकः– १६/०९/२०२६

( स. द. डावखर )
उपकुलसचिव (अतिरिक्त कार्यभार)

प्रत माहितीसाठी :

१. मा. कुलगुरु कार्यालय, प्रस्तुत विद्यपीठ
२. मा. प्र–कुलगुरु कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ
३. मा. कुलसचिव कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ

प्रत माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी:–

१. मा. सर्व विद्याशाखा अधिष्ठाता, प्रस्तुत विद्यापीठ
२. मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ
३. मा. विभागप्रमुख, सर्व विद्यापीठीय शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विद्यपीठ
४. मा. प्राचार्य/संचालक, सर्व संबंधित महाविद्यलये/सर्व मान्यताप्राप्त परिसंस्था, प्रस्तुत विद्यपीठ
५. मा. संचालक, अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष,प्रस्तुत विद्यापीठ
६. मा. उपकुलसचिव, संलग्नता कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ
७. मा. उपकुलसचिव, शैक्षणिक प्रवेश, प्रस्तुत विद्यापीठ
८. मा. उपकुलसचिव, शैक्षणिक पात्रता विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
९. मा. संचालक माहिती तंत्रज्ञान सेवा विभाग,प्रस्तुत विद्यापीठ
१०.सहायक कुलसचिव, अहिल्यानगर व नाशिक विद्यापीठ उपकेंद्र